लोकमत



## माहिती मिळविण्यासाठी इंटरनेट सशक्त माध्यम : पेठे

नाशिक। दि. २ (प्रतिनिधी)

इंटरनेट हे माहिती मिळविण्याचे सशक्त माध्यम आहे. वाचनसंस्कृतीची माध्यमे बदलत चालली आहे. इंटरनेट, आयपॅडच्या माध्यमातून मराठी साहित्याचा आस्वाद घरबसल्या घेणे शक्य झाले असल्याची माहिती संगणक तज्ज्ञ संजय पेठे यांनी मेळाव्यात दिली.

साहित्यिक मेळाव्यात 'इंटरनेटवरील साहित्याचा आस्वाद कसा घ्यावा?' या विषयावर आयोजित व्याख्यानात पेठे यांनी सांगितले, इंटरनेट हे माध्यम मोफत असले तरी त्याचे काही नियम पाळावेच लागतात. आपली संस्कृती सर्व स्तरांतील लोकांमध्ये पोहोचविण्याचे ते उत्तम माध्यम आहे. 'ग्लोबल मराठी डॉट कॉम' या संकेतस्थळावर बालकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना उपयुक्त अशी माहिती संकलित करण्यात आलेली आहे. या संकेतस्थळावर एका क्लिकवर सर्व माहिती उपलब्ध होऊ शकते. यावेळी पेठे यांनी 'बुकगंगा डॉट कॉम' या संकेतस्थळाचीही सविस्तर माहिती देत त्यातील गमतीजमती आणि आश्चर्य उपस्थितांसमोर मांडले.